## नियमित दिवाणी दावा क्र.१५२/२०२५ मधील निशाण क्र.५ खालील आदेश

[ CNR No.MHKO090004892025 ]

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.१, ५ व ६ यांनी वादीच्या ताब्यास अडथळा निर्माण करु नये तसेच प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी वहिवाटीच्या रस्त्यास अडथळा निर्माण करु नये, याकरिता सादर केला आहे. वादी यांनी सविस्तर युक्तिवाद सादर केला की, प्रतिवादीमार्फत वहिवाट रस्त्यामध्ये खोदकाम करुन सदरील रस्ता अडविण्यात आला आहे. त्यामुळे पोल्ट्री फॉर्ममध्ये वाहने तसेच पक्षांचे खाद्य व पाणी नेण्यास अडथळा निर्माण झाला आहे. सदरील पोल्ट्री फॉर्ममध्ये ३५,००० पक्षी असून त्यांचे अन्न व पाणी संपले आहे. त्यांच्या अन्न व पाण्याची तात्काळ व्यवस्था न केलेस ३५,००० पक्षी अन्नपाण्याविना मरण पावतील. त्यामुळे त्याबाबत तात्काळ एकतर्फा आदेश देण्यात यावा.

२. वादीचा दावा, दस्तऐवज व छायाचित्रे यांचे अवलोकन केले. दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८० प्रमाणे प्रतिवादींना देण्यात येणाऱ्या नोटीसची अट शिथील करण्यात आली असलेने दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ८०(२) प्रमाणे एकतर्फा मनाई हुकूमाचा आदेश विरुध्द पक्षाचे म्हणणे ऐकल्याशिवाय पारीत करता येत नाही. सबब वादीमार्फत मागण्यात आलेली मनाईच्या दादीबाबत एकतर्फा आदेश विरुध्द पक्षास नोटीस काढल्याखेरीज पारीत करता येणार नाही.

३.    तथापि ३५,००० पक्षी यांच्या अन्न व पाणी यांचा देखील प्रश्न याठिकाणी गुंतलेला असलेने पक्षांच्या सुरक्षिततेकरिता काही आदेश पारीत करणे क्रमप्राप्त ठरतात. अन्यथा ३५,००० पक्षी अन्नपाण्यावाचून मृत्युमुखी पडतील व सदरील दाव्यास कसलाही अर्थ राहणार नाही. सबब न्यायाच्या दृष्टीने त्यासंदर्भात योग्य ते आदेश पारीत केलेस विरुध्द पक्षास देखील त्याबाबत कुठलीही क्षती पोहोचणार नाही. सबब एकंदरीत संपुर्ण बाबींचा विचार करता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :-

## आदेश

१] वादी यांनी मागणी केलेप्रमाणे तुर्तातूर्त मनाईची दाद का मंजूर करणेत येवू नये, यासंदर्भात प्रतिवादी क्र.१, ५ व ६ यांना कारणे दाखवा नोटीस पाठविणेत यावी.

२] वादी अथवा त्यांचे प्रतिनिधी यांना पोल्ट्री फॉर्म नामे ज्योर्तिमय ॲग्रो प्रा.लि., गट नं.६१७, बहिरेवाडी, ता. आजरा, जि. कोल्हापूर येथील पक्षांना वादग्रस्त वहिवाटीतून पक्षांकरिता अन्न, पाणी व औषधे पुरविणेची पुढील तारखेपर्यंत मुभा देणेत येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by NARENDRA
Date: 2025.08.14 17:37:53 +0530

स्थळ : गडहिंग्लज.    ( न. श्री. पुरी )

दिनांक : १४.०८.२०२५.    दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, गडहिंग्लज